**विशेष दिवाणी दावा क्र.३२/२००७ मधील नि.क्र.२२९ वरील आदेश**

**CNR No.MHSN050014452007**

१. वादी यांनी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ मयत असल्यामुळे त्यांचे वारस अभिलेखात दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ सौ. दिपा दिलीपराव शिंदे (गवळी) या दिनांक १८.०७.२०२२ रोजी कोल्हापूर येथे मयत झालेल्या आहेत. परंतु प्रतिवादीतर्फे त्या मयत असल्याची कोणतीही सुचना अथवा पुरसिस रेकॉर्डवर ठेवलेली नाही. त्यामुळे वादींना त्याची माहीती मिळाली नसल्यामुळे मयताचे वारस रेकॉर्डवर आणण्याबाबत पुर्तता करता आली नाही. प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अगोदरपासूनच दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.१अ व ३ म्हणून सामील आहेत. त्यामुळे त्यांना नव्याने सामील करण्याची आवश्यकता नाही. मयताचे वारस रेकॉर्डवर घेण्यास १ वर्ष ७ महिने १८ दिवसाचा विलंब झालेला आहे. मयत प्रतिवादी परगावी राहत असल्याने व वेळेत माहीती न मिळाल्यामुळे विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास वादीचे पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणार आहे. करीता मयत प्रतिवादी क्र.२ यांचे नावास कंस करुन वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विंलब माफ करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जाला अनुषंगून प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी व प्रतिवादी क्र.२ हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याचे समजले नाही असे चुकीचे कथन करुन अर्ज दिला आहे. वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांनी सबळ कारण दिलेले नाही. करीता वादीचा अर्ज २०००/- रुपये खर्च

बसवून नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी यांच्याविरुध्द घोषणा व मनाई आदेशाकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी त्यांच्या अर्जातील कथनामध्ये प्रतिवादी क्र.२ या मयत असल्याबाबत कोणतीही सुचना प्रतिवादी यांनी दिली नसल्यामुळे किंवा त्याबाबत पुरसिस अभिलेखात दाखल न केल्यामुळे त्यांना मयताचे वारस रेकॉर्डवर घेण्याबाबत पुर्तता करण्यात आली नाही. करीता त्यांना वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा असे त्यांनी शपथेवर कथन केले आहे.

६. प्रस्तुत दावा हक्कज्ञापन व मनाई हुकूमासाठी असल्यामुळे दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांची योग्य माहीती नमूद असणे गरजेचे आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झाला असला तरी त्यांनी प्रतिवादी क्र.२ यांचे वारस सुरुवातीपासूनच दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.३ म्हणून नमूद असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे तांत्रीक दोष राहु नये, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी वादी यांना प्रतिवादी क्र.२ यांच्या नावासमोर कंस मारुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची पुर्तता करणेकामी झालेला विलंब माफ करणे न्यायोचित होणार आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

वादी यांचा नि.क्र.२२९ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
MUKUL MADHUSUDAN
CHITALE
Date: 2024.07.22
18:08:02 +0530

**ठिकाण –इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक–१५.०७.२०२४** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, इस्लामपूर**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **१५.०७.२०२४** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **२२.०७.२०२४** |